# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,पालघर

आफरिन अपार्टमेंट बी विंग १ मजला रुम नंबर १०६,१०७,१०८ रेल्वे फाटकाजवळ,
नवली पालघर (पु) दुरध्वनी क्र.०२५२५-२५४२७७
Email Id: acswpalghar@gmail.com


जा.क्र.सआसक/पालघर/प्रंल.शि/२०२०-२१/ ४४ दिनांक :- १३/०१/२०२१


St. G. G. College
Inward No 2165
Date 13/01/2021


प्रति,
मा.प्राचार्य / डीन,
सर्व महाविद्यालये
जि.पालघर

**विषय :- सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाचे महाडीबीटी प्रणालीमध्ये शिष्यवृत्तीचे अर्ज भरुन घेणेबाबत.**

**संदर्भ** :- मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,मुंबई विभाग मुंबई यांचे पत्र क्र.५१ दि.०७/०१/२०२१

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणास कळविण्यात येते की सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करण्याकरीता महाडीबीटी प्रणाली दि. ०३/१२/२०२० पासुन कार्यान्वित करण्यात आली आहे. सन २०२०-२१ करिता नुतनीकरणाचे अर्ज दि. १५/१२/२०२० पर्यंत विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे अपेक्षित होते.

त्याअनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य व सहाय्यक आयुक्त, यांची दिनांक.०८/१२/२०२० रोजी संयुक्तीक व्हिडीओ कॉन्फरन्स घेवुन आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांचे बोनाफाईड सर्टिफिकेट, मागील वर्षाचे निकालपत्र इ. आवश्यक कागदपत्रे त्यांचे ईमेल अथवा व्हॉटसअपद्वारे घरपोहेच मिळण्याची व्यवस्था करण्याच्याही सूचना देण्यात आल्या होत्या.

तथापि महाडीबीटी प्रणालीवरील डॅशबोर्डची सद्यस्थिती पहाता अर्जाची सद्यस्थिती अपेक्षित अर्जाच्या तुलनेत खूपच कमी आहेत. बिगर व्यावसायीक विद्यार्थ्यांच्या परिक्षा झालेल्या आहेत अशा महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून तात्काळ अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सन २०२०-२१ मध्ये कोणतेही शिष्यवृत्तीस पात्र मगासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहणार नाहीत. याची दक्षता घेण्यात यावी.

आपला विश्वासु,

(श्री.किशोर बडगुजर)
सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,
पालघर

प्रत - माहितीस्तव सविनय सादर
मा. प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई